पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/१२/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **०५/१२/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
३. मा.काटे स्वाती(माई)चंद्रकांत
४. मा.चोंधे आरती सुरेश
५. मा.मुंढे उषा अंकुश
६. मा.कुटे निर्मला संजय
७. मा.वैशाली जालिंदर काळभोर
८. मा.मिनल विशाल यादव

या शिवाय मा.झगडे- सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.घुबे – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहादरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) PWD मैदान सांगवी येथे पवनाथडी जत्रेचे आयोजन करणेबाबत. – मा.हिराबाई(नानी घुले), मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) अभ्यासदौरा आयोजित करणेबाबत.– मा.हिराबाई(नानी) घुले, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.3) "पंडीत दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्यवाढ कार्यक्रम" या योजनेबाबत.- मा.वैशाली काळभोर, मा.मिनल यादव यांचा प्रस्ताव.

---------

दिनांक १२/११/२०१८ व २२/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०५/१२/२०१८

सुचक : मा.हिराबाई(नानी)घुले अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा. हिराबाई(नानी)घुले, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव –

सन २०१८-१९ या कालावधीत महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभागाच्या अंतर्गत आयोजित केल्या जाणा-या पवनाथडी जत्रेचे आयोजन PWD मैदान, सांगवी येथे फेब्रुवारी - २०१९ मध्ये पहिल्या अथवा दुस-या आठवडयामध्ये करण्यास, सदर कामी खर्च कमी पडल्यास आवश्यकतेनुसार (नागरवस्ती विभागाअंतर्गत योजना) महिला बाल कल्याण इतर योजना कार्यक्रम व तरतूद मधुन खर्च करण्यास व सदर कामी येणा-या खर्चास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०५/१२/२०१८

सुचक : मा.हिराबाई(नानी)घुले अनुमोदक : मा.आरती चोंधे

संदर्भ : मा.हिराबाई(नानी)घुले, मा. आरती चोंधे यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागाकडून मा.महिला व बालकल्याण समिती सदस्या यांच्यासाठी राजस्थान येथे डिसेंबर २०१८ अखेर किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवडयात अभ्यास दौरा आयोजित करण्यास, सदर दौ-यासाठी येणा-या महिला सदस्यांकडून संमतीपत्र घेवून त्याकरीता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०५/१२/२०१८

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.मिनल यादव

संदर्भ : मा.वैशाली काळभोर, मा.मिनल यादव यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र. १० दि. ०४/०९/२०१८ नुसार एकुण १४ प्रशिक्षण विषय व प्रती लाभार्थी एकुण प्रशिक्षण शुल्क (सर्व करांसहित) यास मान्यता देणेत आलेली आहे. सदर सर्व करांसहितच्या दरात जी.एस.टी.ची १८% रक्कम अंतर्भुत आहे. त्यामुळे प्रपत्र – अ मधील नमुद सर्व प्रशिक्षण विषयांच्या सर्व करांसहित असलेल्या प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेतून १८% जी.एस.टी.ची रक्कम वजा जाता येणा-या प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेवर १) लाभार्थी १०% सहभाग शुल्काची रक्कम लाभार्थ्यांकडून संस्थेस घेणेस मान्यता देणेत येत आहे.

२) याच रक्कमेनुसारच्या द्यावयाच्या देयकातून ५% रक्कम लेखापरिक्षण पुर्ततेकामीची कपात करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. ३) याच रक्कमेनुसार संभाव्य होणा-या एकुण खर्चाच्या रक्कमेवर अनामत रक्कम व स्टॅम्प ड्युटी रक्कम अगाऊ घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच लाभार्थ्यांकडुन जमा झालेल्या रक्कमेवरील जी.एस.टी.ची रक्कम संस्थेमार्फत भरणे, संस्थेमार्फत भरणेत आलेली सदरची जी.एस.टी.ची रक्कम संस्थेस अदा करणे व सदर ठरावालगतच्या प्रपत्र – अ नुसार प्रति लाभार्थी एकुण प्रशिक्षण शुल्क (सर्व करांसहित) असलेल्या रक्कमेच्या ९०% प्रमाणे होणारी रक्कम फक्त संस्थेस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. मनपामार्फत देणेत येणारी जी.एस.टी. ची रक्कम जी.एस.टी. कार्यालयाकडे भरणेचे दायित्व संस्थेचे आहे. त्यामुळे मागील वर्षी मे. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला चालु वर्षी अदा करणेत येणारी जी.एस.टी.ची रक्कम ही जी.एस.टी. कार्यालयाकडे भरणेत आल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र / हमीपत्र संस्थेकडून घेणेत यावे.चालु वर्षातील उर्वरित कालावधीचा विचार करता संपुर्ण प्रशिक्षण हे चालु वर्ष अखेरपर्यंत पुर्ण होणे अपेक्षीत आहे. त्यामुळे होणा-या प्रशिक्षणाची देयके ही चालु अथवा पुढील वर्षाच्या सदर योजनेसाठी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच वस्तीपातळीवरुन ज्यांची ज्यांची मागणी असेल त्या सर्व महिलांच्या प्रशिक्षणाच्या गटनिहाय फाईल्स स्विकारणेत याव्यात.संस्थेबरोबर करारनामा केलेला असला तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे. याकामी / या व्यतिरिक्त सदर योजनेसंबंधित आवश्यक ते सर्व निर्णय घेणेचे / येणारा प्रत्यक्ष खर्च करणेचे सर्व अधिकार मा.आयुक्तसो यांना देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७५१/२०१८
दिनांक : ०६/१२/२०१८

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.